# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २७/०३/२०२६ (शुक्रवार )**

---

## पोलीस ठाणे पाचगाव हद्दीतील मौजा चांपा पारधी बेडा शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणाऱ्या ३ आरोपींवर गुन्हे नोंद, ५ लाख १५ हजारांचा मुद्देमाल जप्त पाचगाव पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव :—** दिनांक २७/०३/२०२६ रोजी पाचगाव पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा चांपा पारधी बेडा शिवारात अवैधरित्या रनिंग भट्टी द्वारे मोहाफुल गावठी दारु काढली जात आहे. मिळालेल्या माहीती च्या आधारे पोलीस पथकाने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्रीमती वृष्टी जैन, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, उमरेड उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली नमुद घटनास्थळी जावुन धाड टाकुन खलील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई क्रं १)** महीला आरोपी हीचेवर कारवाई करत **६ रनिंग भट्टया** नष्ट केल्या. घटनास्थळावरून २४०० लिटर मोहाफुल रसायन सडवा आणि ११० लिटर मोहाफुल गावठी दारू, रनिंग भट्टी मध्ये उकळलेले ६०० लिटर मोहाफुल रसायन सडवा, लोखंडी ड्रम,प्लास्टीक ड्रम, जळाउ लाकुड आणि इतर साहित्य जप्त केले. **कारवाई क्रं २)** दुसऱ्या महीला आरोपीवर कारवाई करत १५ रनिंग भट्टया नष्ट केल्या. घटनास्थळावरून ३२०० लिटर मोहाफुल रसायन सडवा आणि १३० लिटर मोहाफुल गावठी दारू, रनिंग भट्टी मध्ये उकळलेले १६०० लिटर मोहाफुल रसायन सडवा, लोखंडी ड्रम,प्लास्टीक ड्रम, जळाउ लाकुड आणि इतर साहित्य जप्त केले. तसेच आरोपी **कारवाई क्रं ३)** नंदकिशोर पवार, वय

३० वर्ष, रा. पारधी बेडा, चांपा, जि.नागपुर याचेवर कारवाई करत रनिंग ६ भट्टया नष्ट केल्या. घटनास्थळावरून पंचासमक्ष २२०० लिटर मोहाफुल रसायन सडवा आणि १०० लिटर मोहाफुल गावठी दारू, रनिंग भट्टी मध्ये उकळलेले ६०० लिटर मोहाफुल रसायन सडवा, लोखंडी ड्रम,प्लास्टीक ड्रम, जळाउ लाकुड ,पाईप आणि इतर साहित्य जप्त केले.

**पोलीसांनी घटनास्थळावरून २००० लिटर मोहाफुल सडवा आणि १२० लिटर मोहाफुल गावठी दारू आणि साहित्य जप्त केले. पोलीसांनी घटनास्थळावरील सर्व रनिंग भट्टया नष्ट केल्या. सदर कारवाईत पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण १) १०,६०० लिटर मोहाफूल सडवा २) ३४० लिटर मोहफुल दारू , ३) एकुण ५७ प्लास्टीक आणि लोखंडी ड्रम ,जळाउ लाकुड, पाईप तसेच दारू गाळण्याचे इतर साहीत्य असा एकुण ५,१५,०००/— रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये प्रत्येकी १ असे ३ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**













## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०४ गुन्हे नोंद

दिनांक २६/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण २४६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०४ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी नामे अजय सुंदरलाल बनवारी,वय ३१ वर्ष,रा. न्यु तोतलाडोह, ता रामटेक आणि संजय हरीचंद कळपेती, वय ४४ वर्ष,रा. न्यु दाहोदा, ता रामटेक यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे २ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे जंगलालजी राजु जैस्वाल, वय ५० वर्ष, रा. चाकहोड आणि जयराम पालसिंग राठोड, वय ४२ वर्ष, रा. माहुरखोरा यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे तसेच आरोपी कलिदंर माधवराव घोसले, वय २९ वर्ष, रा. उमठा ह. मु. साखरखेडा, ता. नरखेड याचेवर

०१ गुन्हा नोंद, अशा एकुण ०४ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०४ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १५ लिटर मोहाफुल गावठी दारू, २१६० मिली देशी दारू असा एकुण २४६०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**